नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०३/२०२६ (शनिवार )

# नागपुर ग्रामीण जिल्हयात रमजान ईद बंदोबस्त यशस्वीरित्या आणि शांततेत पार पडला.

दिनांक २१/०३/२०२६ रोजी रमजान ईद निमित्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात एकुण १०२ ठिकाणी मुस्लीम बांधवाचे नमाज पठण पार पडले. रमजान ईद निमित्य नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला होता. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त आखला होता. सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी आपआपल्या उपविभागाात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत सतर्क पेट्रोलीग केली तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी/अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडले.

जिल्हयात ६ उपविभागात ६ उपविभागीय पेट्रोलींग पथक आणि संपुर्ण परीसरात १ पेट्रोलींग पथक नेमण्यात आले होते. दंगानियंत्रण २ पथक, राज्य राखीव दलाचे २ प्लाटुन , ११०० गृहरक्षक यांचा सुध्दा बंदोबस्तामध्ये समावेश होता. विशेष ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले होते. **अशा प्रकारे नागपुर ग्रामीण जिल्हयात रमजान ईद ( ईद — उल — फित्र) चा उत्सव शांततेत पार पडला.**

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ६९ हजार ७६० रूपयाचा मुद्देमाल जप्त, अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक २१/०३/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, इलेक्ट्रीक ओला स्कुटीने मौजा कोदामेंढीकडुन अरोलीकडे **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भांडेवाडी शिवारातील माणिक चौधरी यांचे शेतासमोरील अरोली कोदामेंढी रोडवरील नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान इलेक्ट्रीक स्कुटी क्र. एम एच—४० सी. डब्ल्यु— ८४९२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता दोन कापडी पिशवीमध्ये देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) दिपांशु विजय मेश्राम, वय १९ वर्ष, रा. नवेगाव ता. मौदा** याला देशी दारूबाबत विचारपुस केली असता **आरोपी २) आकाश विनोदकुमार जयस्वाल, वय ४० वर्ष, रा. पारशिवनी** याचे सांगणेवरून अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत असल्याचे सांगितले. तसेच डोंगरगाव येथील आकाश जयस्वाल याचे देशी दारू भट्टीत काम करणारा आरोपी क्र. ३) शेखर समरीत, वय २१ वर्ष, रा. डोंगरगाव ता. मोहाडी जि. भंडारा याने आकाश जयस्वालचे सांगणेवरून देशी दारूचे भट्टीतून देशी दारू कापडी थैलीत भरून आरोपी क्र. १) याचेकडे दिल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १७२ निपा किंमती ९७६०/— रूपये, ३) इलेक्ट्रीक स्कुटी क्र. एम एच—४० सी. डब्ल्यु— ८४९२ किंमती ५०,०००/—रू ४) एक ॲडरॉइड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकुण किंमती** ६९,७६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी १) दिपांशु विजय मेश्राम, वय १९ वर्ष, रा. नवेगाव ता. मौदा २) आकाश विनोदकुमार जयस्वाल, वय ४० वर्ष, रा. पारशिवनी ३) शेखर समरीत, वय २१ वर्ष, रा. डोंगरगाव ता. मोहाडी, जि. भंडारा यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन अरोली येथे कलम ६५(अ), ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.

दिनांक २०/०३/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन काटोल, बोरी यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्ट्‌ापट्ट्‌ी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३३८३/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे राजेश छोटेलाल बेहनिया, रा. कारला, ता. काटोल हा सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी क्र. १) आशिष मधुकरराव हेलवटकर, वय ४८ वर्षे, रा. मंगरूळ, ता. समुद्रपुर, जि. वर्धा, ह. मु. बुटीबोरी २) अविनाश शुभाष डुभरे, वय ५५ वर्षे, प्रभाग क्र. ०५, नविन वस्ती बुट्टीबोरी हे सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद अशा ०३ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०३ गुन्हे दाखल केले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २०/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ४६८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे महिला आरोपी हिचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे विजय उर्फे राजा संतोश बरमईया, वय १९ वर्ष, रा. ह. मु. गुमथळा, ता. कामठी, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे अनिश गोवर्धन राजपूत, वय २६ वर्ष, रा. राजूरवाडी ता. उमरेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे महिला आरोपी हिचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे संदीप शंकरराव गोंडाने, वय ३४ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपूर याचे वर एक गुन्हा नोंद अशा एकुण ०५ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०५ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ४२ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १०८० मिली देशी दारू असा एकुण ४६८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक २०/०३/२०२६ **रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी क्र. १) नामे महेंद्र नामदेवजी बिरणकर, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०६,**

**नगरधन २) सरोग्य संतोष मेश्राम, वय २६ वर्ष, रा. बेलडोंगरी ता. रामटेक** हे नगरधन येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २१/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १२४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे ०९ आरोपी अशा एकुण ६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ८१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने